ISSN 2349-1027

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq Sonpeth Dist Parbhani

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCHERS

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

**Year - IV, Issue - VII, Vol.- I** **Aug. 2016 To Jan. 2017**

EDITOR IN CHIEF
**Dr. AMBUJA MALKHEDKAR**

Sonpeth Pin-431516

Issue - VII, Vol. I
IAP IWR
IMPACT FACTOR 2.47
ISSN 2349-1027
Aug. 2016 To Jan. 2017

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Business Ethics in Hotel Industry | Satyenkumar Sitapara | 1-4 |
| 2 | Role uf Ethics in Marketing Decisions | Khaledkhan Pathan | 5-9 |
| 3 | Role of Corporates with CSR for Improving Educational System in India | Dnyaneshwar Pawade | 10-15 |
| 4 | Banking Reforms Since 1991 | Dr. Dileep S. Arjune | 16-19 |
| 5 | Total Quality Management | Purushottam B. Wakde | 20-22 |
| 6 | अकोला पाठबंधारे मंडळ, अकोला - एक अध्ययन | गणेश भरतराव ढवळे | 23-28 |
| 7 | श्रीमंत गोपिकाबाई पेशवे | डॉ.आर.एम.साळुंके | 29-40 |
| 8 | नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी : मन्वंतराच्या नव्या जाणिवा | डॉ. विजय कुमठेकर | 41-47 |
| 9 | विश्व व्यापार संघटना : समीक्षणात्मक मूल्यमापन | डॉ. राजेंद्र नामदेवराव मोरे | 48-52 |
| 10 | एकात्मिक बालविकास योजनेचे समाजशास्त्रीय विश्लेषण | रंगराव पांडूरंग हेंडगे | 53-55 |
| 11 | संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान : यंत्रणा व कार्यपध्दती | अशोक काकासाहेब जाधव | 56-61 |
| 12 | भारतीय संविधान आणि मानव अधिकार - एक समाजशात्रीय अभ्यास | नागनाथ दिगांबर येसके | 62-65 |

IMPACT FACTOR
2. 47
ISSN 2349-1027
Indo Western Researchers (IWR)
Issue : VII, Vol. I
Aug. 2016 To Jan. 2017
www.irasg.com

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Dist.Parbhani

Research Paper 11 Public Administration

# संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान : यंत्रणा व कार्यपध्दती

**अशोक काकासाहेब जाधव**
संशोधक
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी

**प्रस्तावना :-**

आधुनिक संतामध्ये संत गाडगेबाबा विलक्षण व्यक्तीमत्वाचे संत होते. याना सुख संपत्तीचा मुळीच मोह नव्हता. स्वत:च्या कुटूंब व संसाराची चिंता नव्हती. परंतू सामाजाची चिंता असणारे संत होते. स्वार्थ व प्रलोभन हे शब्द त्यांच्या संपूर्ण आयुष्यात कुठेही दिसून येत नाहीत. समाजातील सर्वांचे दु:ख तेच माझे दु:ख हे सत्य जपलेल्या सत्यशोधक श्रंखलेतील संत गाडगेबाबा हे विलक्षण सत्यशोधक होते. अस्वच्छतेबाबत इतरांची समस्या ती माझी समस्या या भावनेने जीवनभर सामाजिक स्वच्छतेचा ध्यास बाळगला व कृति केली. समाजातील घाण काढून समाज स्वच्छ तर केला परंतू व्यक्तीचे मन साफ करण्याचे कठिण काम गाडगेबाबांनी केले. समाजामधील अंधश्रध्दा, ढोंगीपणा, माजलेले आवडंबर मानसा- मानसातील भेद, विषमता याला मुठमाती मिळावी म्हणून जीवनभर शारिरीक यातना सहन केल्या. समाजाला विज्ञानाचा मार्ग दाखविला ज्या पासून रोगराई निर्माण होते असे जिवाणू, विषाणू, परोपजीवी इ. रोगजंतू असून त्याच्या संसर्गा इ. कारणाने व्यक्तीला रोगराई होते याची जाणीव गाडगेबाबांना होती. देवदेवतांच्या प्रकोपातून रोग निर्माण होतात हे समुळ खोडून टाकण्याची विलक्षण बुध्दीमता बाबाकडे होती. आजाराचे खरे कारण न जानता समाज विविध प्रकारच्या गैरसमजूती व दैववादातून आजार बरा करण्यासाठी डॉक्टरांचा उपचार न घेता गंडा-दोरा, अंगारा-धुपारा करणाज्या ढोंगी बाबाला शरण जाणे, बकरे कोंबडे देवाला कापणे इ. गोष्टीच्या मागे लागला होता. यामुळे आजाराची तीव्रता कमी न होता अपायकारक बाबीमध्ये वाढ करण्याचे पाप समाजातील काही लोकांनी केले व आजही करित आहेत. अज्ञानी समाजाला ज्ञानी बनविण्याचे प्रयत्न गाडगेबाबांनी केले.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta Sonpeth Dist Parbhani

**उद्देश**

१. ग्राम स्वच्छता अभियानाचा इतिहास पाहणे.

२. ग्राम स्वच्छतेच्या अभियानाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.

३. ग्राम स्वच्छता अभियान निर्मितीच्या कारणांचा शोध घेणे.

४. ग्राम स्वच्छता अभियानाची यंत्रणा व कार्यपध्दती पाहणे.

**अभ्यास पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. यात शासकीय निर्णय, संदर्भ ग्रंथ, संकेत स्थळे व मासीके याचा वापर करण्यात आला आहे.

**ग्राम स्वच्छता अभियानाचा इतिहास**

१९७० च्या दशकाच्या उत्तरार्धा पर्यंत स्वच्छतेच्या दिशेने शासनाकडून कोणतेही प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाहीत. १९८१ मध्ये 'एक दशक' कार्यक्रमांतर्गत २५% ग्रामीण स्वच्छतेचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे प्रयत्न झाले. १९८६ मध्ये 'केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम' सुरू करण्यात आला. परंतु १९९२ पर्यंत केवळ २.७३% ग्रामीण जनतेला स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यात शासनाला यश आले. हा कार्यक्रम अनुदान आधारित होता. तरी पण हा कार्यक्रम अधिक यशस्वी होवू शकला नाही. १९९६-९७ मध्ये भारतीय संचार संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार केवळ २% लोकांनी अनुदानामुळे शौचालये बांधली, तर ५५% लोक स्वयंप्रेरित झाले. बांधण्यात आलेल्या वैयक्तिक शौचालयाचा वापरही ५०% पर्यंतच झाला. यासर्व गोष्टी विचारात घेवून १९९९ मध्ये केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम 'संपूर्ण स्वच्छता अभियाना' मध्ये समाविष्ट करून देशातील काही निवड राज्यात व जिल्हयात राबविण्याचा निर्णय घेतला.

२०११ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील शौचालय सुविधा उपलब्ध असलेली व नसलेली माहिती खालील तक्त्याआधारे स्पष्ट करता येईल.

**ग्रामीण महाराष्ट्रातील विभागनिहाय स्वच्छतेची व्याप्ती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | विभाग | टक्केवारी | | २००१-११ या कालावधीत घरातील शौचालयाची वाढती टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | घरात शौचालय असलेली कुटुंबे | उघड्यावर शौचविधी | |
| ०१. | अमरावती | २९.५८ | ६९.०८ | ०९.३५ |
| ०२. | औरंगाबाद | २०.८७ | ७७.०९ | ०८.३९ |
| ०३. | कोकण | ५३.६८ | ३१.०६ | ३०.८४ |
| ०४. | नागपूर | ४०.६८ | ५८.०३ | १६.७० |
| ०५. | नाशिक | २८.४४ | ६१.०८ | १४.१६ |
| ०६. | पुणे | ५९.४७ | ३०.०८ | ३९.६४ |
| ०७. | महाराष्ट्र | ३८.०० | ५५.०८ | १९.७९ |

आधारः पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, अहवाल २०११ (सुजल निर्मल मासिक, जून २०१२)

Late Ramesh Warpudkar ACS College

वरिल तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, लातूर जिल्हा मराठवाडयात असून मराठवाडा विभागातील कुंटूंबाकडे उपलब्ध शौचालयाची टक्केवारी महाराष्ट्राच्या इतर विभागाच्या तुलनेत फार कमी आहे.

महाराष्ट्र राज्यात स्वच्छता सुविधाची कमतरता व जलजन्य आजार यावर उपाययोजना करण्यासाठी इ.स. १९७९-८० पासून महाराष्ट्र शासनाने 'ग्राम स्वच्छता अभियान' राबविण्यास सुरूवात केली. परंतू हे अभियान यशस्वी झाले नाही. महाराष्ट्रातील ग्राम स्वच्छतेच्या संदर्भात जी उपेक्षेची परिस्थिती दिसून आली ती लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने १९९६ मध्ये नव्याने 'ग्रामस्वच्छता अभियान' लागू करून ग्रामीण भागात प्रसाधन गृहे बांधण्यासाठी महत्वाकांक्षी योजना घोषित केली. शासनाच्या सर्व ग्राम स्वच्छता कार्यक्रमाचा मुळ उद्देश ग्रामीण जनतेचे आरोग्यमान आणि जीवनमान उंचावणे हा होता.

**अभियान निर्मिती**

ग्रामीण भागात अशुध्द पाणी, अस्वच्छ परिसर व वैयक्तिक स्वच्छते अभावी उद्भवणाज्या रोगामुळे पिडित असलेल्यांची आकडेवारी पाहता ग्राम स्वच्छता हा उद्देश फारसा सफल न झाल्याचे जाणवल्याने, ज्यांचे आरोग्यमान, पर्यायाने जीवनमान उंचावण्यासाठी इ.स.१९९५-९६ पासून ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत कार्यान्वीत आलेली किरकोळ स्वरूपाची बक्षीस योजना रद्द करून इ.स. २००० पासून "संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान" राबविण्यात येत आहे. या योजनेची व्यापकता वाढविल्यानंतर तिला ग्रामीण जनतेकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद, होणारी जनजागृती, लोक सहभागातून होणारी विकास कामे पाहता ग्रामीण भागात कायमस्वरूपी स्वच्छतेची संस्कृती निर्माण करण्यासाठी आखलेला हा कार्यक्रम केवळ अभियान या पुरता मर्यादित न राहता ती एक विधायक अभिनव व लोक चळवळ व्हावी, 'स्वच्छतेतून समृध्दीकडे' ही संकल्पना प्रभावीपणे राबवावी असा शासनाचा मानस आहे.

**संकल्पना**

'स्वच्छता' म्हणजे मानवाची जीवन जगण्याची अशी पध्दती आहे की, ज्यामुळे मानवाला निरोगी राहण्यास, दीर्घायु राहण्यास व अर्थपुर्ण जीवन जगण्यास मदत होते. स्वच्छता आणि आरोग्य याचा घनिष्ठ संबंध आहे असे म्हटले जाते की, 'स्वच्छता जिथे, आरोग्य तिथे' या नुसार मानवाला आरोग्य प्रद जीवन जगण्यासाठी स्वच्छता जपने आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, स्वच्छता अशा सर्व घटकांना नियंत्रित करू शकते की, जे मानवाच्या शारिरिक विकास, स्वास्थ आणि जीवन यावर विपरित परिणाम करू शकते. स्वच्छतेचा सरळ संबंध स्वच्छ वातावरणाशी अर्थात उत्तम आरोग्याशी आहे. स्वच्छतेचा मुख्य उद्देश म्हणजे मानवी मलमूत्र, कचरा, सांडपाणी याचे सुरक्षित व्यवस्थापन करणे होय. शौचालय, खत खड्डे, शोष खड्डे हे स्वच्छतेचे महत्वाचे घटक आहेत.

ग्राम स्वच्छता संकल्पनेत मानवी आरोग्य (Hygiene), वैयक्तीक स्वच्छता (Parsonal Sanitation), पर्यावरण स्वच्छता (Eco-Sanitation) आणि ग्राम स्वच्छता (Rural Sanitation) इ. समावेश होतो.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta Sonpeth Dist.Parbhani

व्याख्या

निर्मल भारत अभियान -

नुसार स्वच्छतेमध्ये वैयक्तिक स्वच्छता, आरोग्य, घर स्वच्छता, सुरक्षित पाणी,कचऱ्याची विल्हेवाट, मलमूत्राची विल्हेवाट व सांडपाण्याची विल्हेवाट इ. चा समावेश होतो.

ग्राम स्वच्छता अभियान निर्मितीची कारणे

१. ग्राम स्वच्छतेचा अभाव - ग्रामीण भागात स्वच्छतेचा अभाव दिसून येतो. गावा गावात उघडयावर शौचविधी केला जातो. कचरा व्यवस्थापनाचा अभाव, सांड पाण्याचा अभाव, कपडे व जनावरे, नदी, तलाव किंवा विहरी जवळ धुणे यामुळे पाणी दुषित होते व आजार उद्‌भवतात. यामुळे स्वच्छता अभियानाची निर्मिती झाली.

२. ग्रामीण आरोग्य सुधारणा - ग्रामीण व्यक्तीचे आरोग्यमान, जीवनमान व राहणीमान उंचावण्यासाठी तसेच मानवी विष्ठेचे व्यवस्थापन, सांडपाणी व कचरा व्यवस्थापन यास चालना मिळावी हा उद्देश आहे.

३. स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा - ग्रामीण भागामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभाव दिसुन येतो. ग्रामीण नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, स्वच्छ पाण्या बाबत जनजागृती व्हावी. तसेच जलजन्य आजार नष्ट व्हावे हा अभियान निर्मिती मागचा उद्देश आहे.

४. वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव - ग्रामीण समाज वैयक्तिक स्वच्छतेकडे विशेष लक्ष देत नाही. लहान मुलांचे केस वाढणे, नखे वाढणे, त्वचारोग होणे इ. प्रकार दिसून येतात. वैयक्तिक स्वच्छतेच्या समस्या सोडविण्यासाठी व याची जनजागृती करण्यासाठी हे अभियान महत्वाचे होते.

५. सांडपाणी व्यवस्थापन - ग्रामीण भागात सांडपाणी अस्ताव्यस्त रस्त्यावर, नदी नाल्यात सोडून दिले जाते. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दुषित होतात व मानवी आरोग्य धोक्यात येते. सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन होण्यासाठी अभियान निर्माण करण्यात आले.

६. शौचालय बांधकामास व वापरास चालना देणे - ग्रामीण भागात शौचालयाचे बांधकाम व वापर अत्यंत निराशाजनक आहे. त्यास चालना मिळावी, व्यक्तीचे आरोग्य सुधारावे या उद्देशाने अभियानाची निर्मिती झाली.

७. महिलांची होणारी कुंचबना - शौचालया अभावी महिलांना सुर्योदयापुर्वी किंवा सुर्यास्ता नंतर उघडयावर शौचविधीस जावे लागत होते. त्यामुळे महिलांची कुंचबना होत होती. त्यांच्या मान सन्मान व प्रतिष्ठेत बाधा निर्माण होत होत्या, हे टाळणे महत्वाचे होते.

८. पर्यावरण समस्या - मानवाला जगण्यासाठी हवा, पाणी व अन्न याची नितांत गरज असते. परंतु उघडयावरील शौचविधी, सांडपाणी यामुळे पर्यावरणीय घटक दुषित बनलेले होते. पर्यावरण स्वच्छता राखण्यासाठी हे अभियान महत्वाचे ठरते.

९. कार्य दिनाची हानी - ग्रामीण भागात उघडयावरील शौचविधी, कचरा व्यवस्थापनाचा अभाव यामुळे आजारपणात दिवसें दिवस वाढ होत होती. त्यामुळे व्यक्ती, सतत आजारी पडून त्याच्या कार्याच्या

...sh Warpudkar ACS College ★ Sonpeth ...431516 ...Parbhani



वेळेसाची हानी होत होती व कुंटूंबात आर्थिक समस्या निर्माण होत होत्या.

**यंत्रणा**

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून राबविले जाते. हे अभियान राज्यभर पंचायतराज संस्थाच्या माध्यमातून राबविण्यात येते. यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत इ. ची भुमिका महत्वाची आहे. तसेच पंचायतराज मधील पदाधिकारी व अधिकारी यांनी या अभियाना बाबत जनजागृती करून अभियान लोकाभिमुख बनविणे आवश्यक आहे.

**अंमलबजावणी प्रक्रिया :-**

या अभियानाची औपचारिक सुरुवात दरवर्षी २ आक्टोबर पासून होते. तत्पूर्वी १ ते २५ सप्टें. या कालावधीत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री हे विभागवार बैठका घेऊन अभियानात सहभागी होण्यासाठी सर्वांना आव्हान करतात. जिल्हा स्तरावर ही जबाबदारी पालकमंत्री, जिल्हा ग्राम स्वच्छता अभियान समितीची असते. गटविकास अधिकारी, तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामसेवक यांच्या सभा बोलावतात. या सभेस आमदार, पंचायत समितीचे सर्व जिल्हा परिषद सदस्य, सभापती, उपसभापती, पंचायत समिती सदस्य, सेवाभावी संस्था, महाविद्यालयाचे प्राध्यापक, स्वातंत्र्य सैनिक यांना निमंत्रित केले जाते. व सक्रिय सहभागाचे आव्हान केले जाते. ३० सप्टें. या दिवशी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, ग्रामसभा घेऊन ग्राम स्तरावरील अभियान समिती निश्चित करण्याची जबाबदारी पार पाडते. तसेच १ ऑक्टो. रोजी महिला ग्रामसभा बोलावून अभियानाच्या तयारी चर्चा करून कृतिकार्यक्रम तयार केला जातो व २ ऑक्टो. रोजी अभियानाची औपचारिक सुरुवात केली जाते. राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमधून एकाच वेळी ग्रामसभा घेण्यात येते, या ग्रामसभेला जिल्हा व तालुका स्तरावरील विशेष अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करतात. यासाठी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देत असतात. व या दिवशी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियांनाची सुरुवात केली जाते.

अभियानाचा कृतिकार्यक्रम कालावधी २ ऑक्टों. ते ३१ डिसेंबर असा असतो. या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर अभियानाच्या अंमलबजावणीचा कार्यक्रम सुरु होतो. यांतर्गत ग्रामसभेचे आयोजन, स्वच्छता साहित्य प्रदर्शन, प्रचार-प्रसिद्धी व प्रात्यक्षिके, गवंडी मेळावा, ग्राम सफाई, घण-कचरा व्यवस्थापन, वैयक्तिक स्वच्छता, घर व परिसर स्वच्छता, गृहसजावट, हात-धुवा कार्यक्रम, शाळा व अंगणवाडी स्वच्छता मोहिम, जनावरे स्वच्छता मोहिम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावरे स्पर्धा, रस्ते दुरुस्ती व श्रमदान मोहिम, गटारे, सांड पाणी व्यवस्थापन व पुनर्वापर मोहिम, घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. याशिवाय सुदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगोपन, बचत गटाचा सहभाग, रोगनिदान व सात रोगप्रतिबंधक मोहिम, पाणी गुणवत्ता, शौचालय बांधकाम, दुरुस्ती व वापराबाबत जनजागृती करणे व शेवटी ३१ डिसेंबर रोजी संकल्प दिवस साजरा केला जातो. ग्रामपंचायतींना वरील प्रमाणे सर्व दिवस साजरे करणे बंधनकारक असून त्याचे अहवाल जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

सारांश, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राज्यातील ग्रामीण भागामध्ये यशस्वी होत आहे. हे अभियान म्हणजे ग्राम स्वच्छते बाबत वरदान ठरत आहे. शौचालय बांधकामा बाबत ज्या उलट सुलट चर्चा

होत्या त्या दुर होण्यास मदत झाली आहे. घरात शौचालय नसावे ही मानसिकता नष्ट करण्यात अभियानाला यश लाभले आहे. या अभियानाच्या माध्यमातूनच हागणदारी मुक्त गाव योजना, स्वच्छतेतून समृध्दीकडे ही संकल्पना उदयास आली. या अभियानाच्या माध्यमातून राज्यातील अनेक गावे, वाडया, तांडे स्वच्छ होण्यास मदत झाली आहे. ग्रामीण भागातील शौचालय बांधकामाचा आलेख वाढलेला आहे. पर्यावरण रक्षणामध्ये या अभियानाची भुमिका महत्वाची ठरलेली आहे.

## संदर्भ सूची :-


१. डॉ. रसाळे उध्दव, मानवतेचे पुजारी, संत गाडगेबाबा (चरित्र आणि विचारधन), १९९४ विद्याभारती प्रकाशन लातूर.

२. Philippe cullet, sanitation law in india : towards a comprehensive conceptual framework, workshop on realizinś. The right to sanitation internatonal and comperative perspective, २ and ३ May २०१३, SOAS university of London.

३. जारे रमेश २००२, स्वच्छतेचे धनी ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

४. डॉ. प्रफुल्ल चौधरी -२०१२ स्वच्छतेतून पर्यावरण, सायन पब्लिकेशन पुणे.

५. ग्रामविकासाची दिशा आणि पंचायतराज प्रशासन, राज्यकृती आराखडा, २००५, यशदा, पुणे.

६. ग्राम स्वच्छता अभियान, एक नवे पर्व, १९९६, महाराष्ट्र शासन शासकीय मुद्रणालय, मुंबई.

७. महाराष्ट्र शासन निर्णय संगाग्रा प्र.क्र.२७८/पापु/१६ मंत्रालय मुंबई दि.२४ सप्टेंबर २००३.

८. मासिक - लोकराज्य, योजना.


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani